# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सर्व मृत व्यक्तींचा स्मृती दिन - ०२ नोव्हेंबर २०२४

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे याचना करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, बिशप्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना ख्रिस्ती मरण आणि सार्वकालिक जीवन ह्याविषयी योग्य ती शिकवण भाविकांना देण्यासाठी पवित्र आत्म्याचे सामर्थ्य व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. ख्रिस्ती आध्यात्मानुसार मरण हा जीवनाचा शेवट नसून नवीन जीवनाची पहाट आहे. बाप्तिस्मा घेतलेला प्रत्येक माणूस ख्रिस्ताबरोबर मरण पावतो आणि पुनरूत्थित होतो ह्या ख्रिस्तसभेच्या शिकवणुकीवर श्रद्धावंताचा विश्वास वाढावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आपल्या पॅरिश मधील सर्व मृत भाविकांनी ख्रिस्तावर विश्वास ठेवला होता. ते ख्रिस्ताच्या सार्वकालिक जीवनात सहभागी व्हावेत आणि स्वर्गीय सुख त्यांना मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या धर्मग्रामात कार्य केलेले तसेच आपले भूमीपुत्र धर्मगुरू, धर्मभगिनी व धर्मबंधू जे देवाघरी गेले आहेत त्यांना सार्वकालिक जीवनाचे सुख प्राप्त व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. मरण अटळ आहे. एक दिवस येथे हजर असलेल्या आपणा सर्वांना चांगले मरण लाभावे, आपल्या पापांची क्षमा मिळून स्वर्गीय सुखाचा आनंद आपल्याला मिळावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.